# महाराष्ट्र विधानसभा
# दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## शुक्रवार, दिनांक २२ डिसेंबर, २०१७
## (सकाळी १०.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे.**

**(अ) तारांकित प्रश्न.**

**(ब) तारांकित प्रश्नाबाबतची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

(१) **शालेय शिक्षण मंत्री** :

(क) "मौजे माणकोली (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील के.आनंद फुड इंडस्ट्रीज या गोदामातुन शासकीय स्वस्त दरातील तांदूळ खुल्या बाजारात विक्रीसाठी नेताना जप्त केल्याबाबत" या विषयावरील श्री. विजय भांबळे व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३१२०४ ला दिनांक १० डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

(ख) "बीड जिल्ह्यातील प्राथमिक व माध्यमिक तसेच, अनुदानित शाळांतील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शालेय पोषण आहाराच्या निधीबाबत" या विषयावरील श्रीमती. संगिता ठोंबरे व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३६९२६ ला दिनांक १० डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

(२) **जलसंपदा मंत्री**

"केंद्र शासनाच्या निधी अभावी राज्यातील सिंचन प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत" या विषयावरील श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक २८६८० ला दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**(क) अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक ३५८ ते ३८५ सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**दोन : अभिनंदनपर प्रस्ताव :-**

प्रसिध्द मराठी कवी श्रीकांत देशमुख यांना २०१७ चा 'साहित्य अकादमी पुरस्कार' जाहीर झाल्याबद्दल अभिनंदनपर प्रस्ताव.

**तीन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**(१) मुख्यमंत्री** : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा सन २०१६-२०१७ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(२) वित्त मंत्री** : (क) महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पाच्या संदर्भात जमा व खर्चाच्या अर्धवार्षिक आढाव्याचे निष्कर्ष दर्शविणारे विवरणपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

(ख) लोकलेखा समितीच्या सन २००१-२००२ या वर्षाच्या आठव्या अहवालातील परिच्छेद क्र.१.२८ मध्ये समितीने केलेल्या शिफारशींनुसार मंत्रालयीन सर्व विभागांनी सन २०१६-२०१७ या वित्तीय वर्षात केलेल्या पुनर्विनियोजनाबाबतच्या माहितीचे एकत्रित विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

**(३) अल्पसंख्याक विकास मंत्री** : मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा बारावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(४) गृहनिर्माण मंत्री** : (क) शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित यांचा सन २००८-२००९, २००९-२०१०, २०१०-२०११, २०११-२०१२ व २०१२-२०१३ या वर्षांचा अनुक्रमे दहावा, अकरावा, बारावा, तेरावा व चौदावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ख) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांचे सन

२०१५-२०१६ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

(५) **जलसंपदा मंत्री** : **" मराठवाडयाच्या विकासासाठी मागील अनेक वर्षापासून अर्थसंकल्पात माननीय राज्यपालांच्या निर्देशानुसार निधीची तरतूद करण्यात येऊनही प्रत्यक्षात हा निधी खर्च न होणे तसेच यावर्षी अवर्षणामुळे संपूर्ण राज्यात पडलेला भीषण दुष्काळ, परिणामी पिण्याच्या पाण्याचा तसेच जनावरांच्या चाऱ्याचा निर्माण झालेला प्रश्न आणि शेतकऱ्यांना सिंचनाच्या सोयी उपलब्ध न झाल्याने शेतकरी आत्महत्यांमध्ये झालेली वाढ..."** या विषयावरील दिनांक १२ एप्रिल, २०१६ रोजी झालेल्या म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्तावावरील चर्चेदरम्यान दिलेल्या आश्वासनाबाबतची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतील.

(६) **सामाजिक न्याय मंत्री** : महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१०-२०११ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(७) **कामगार मंत्री** : (क) नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, नागपूर यांचा सन २००८-२००९ व २००९-२०१० या वर्षांचा अनुक्रमे सातवा व आठवा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ख) नागपूर व वर्धा जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, नागपूर यांचा सन २०१०-२०११, २०११-२०१२ व २०१२-२०१३ या वर्षांचा अनुक्रमे सदतीसावा, अडतीसावा व एकोणचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ग) रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, रायगड (रायगड जिल्ह्याकरीता) यांचा सन २०११-२०१२, २०१२-२०१३, २०१३-२०१४, २०१४-२०१५ व २०१५-२०१६ या वर्षांचा अनुक्रमे दहावा, अकरावा, बारावा, तेरावा व चौदावा वार्षिक

अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(घ) सुरक्षा रक्षक मंडळ, बृहन्मुंबई व ठाणे जिल्हा, नवी मुंबई यांचा सन २०१२-२०१३ या वर्षाचा बत्तीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ङ) मुंबई भाजीपाला बाजार असंरक्षित कामगार मंडळ, मुंबई यांचा सन २०१२-२०१३, २०१३-२०१४, २०१४-२०१५ व २०१५-२०१६ या वर्षांचा अनुक्रमे अठ्ठावीसावा, एकोणतीसावा, तीसावा व एकतीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(च) अमरावती जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, अमरावती यांचा सन २०१३-२०१४, २०१४-२०१५ व २०१५-२०१६ या वर्षांचा अनुक्रमे पहिला, दुसरा व तीसरा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**चार : लोकलेखा समितीचा एकतिसावा अहवाल सादर करणे.**

**पाच : सार्वजनिक उपक्रम समितीचा पंधरावा अहवाल सादर करणे.**

**सहा : पंचायती राज समितीचा पहिला व दुसरा अनुपालन अहवाल तसेच आठवा व नववा अहवाल सादर करणे.**

**सात : विधानसभा विशेषाधिकार समितीचा खालील प्रकरणासंदर्भातील अहवाल सादर करणे :-**

सन्माननीय विधानसभा सदस्य श्री.राजेश क्षीरसागर यांनी श्रीमती ज्योतीप्रिया सिंह, तत्कालीन अपर पोलीस अधीक्षक, कोल्हापूर व विद्यमान पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा २, पुणे शहर, पुणे आणि श्रीमती वैशाली माने, तत्कालीन पोलीस उप अधीक्षक, कोल्हापूर व विद्यमान सहायक पोलीस आयुक्त, पुणे यांच्याविरुध्द उपस्थित केलेले विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण.

**आठ : विधानसभेने संमत केलेल्या विधेयकांना विधानपरिषदेची संमती जाहीर करणे.**

**नऊ : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).**

**दहा : औचित्याचे मुद्दे.**

**अकरा : (अ) लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये)**

(१) **सर्वश्री. बसवराज पाटील, त्र्यंबक भिसे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसुल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"औसा (जि.लातूर) तालुक्यातून जाणाऱ्या रत्नागिरी ते नागपूर (वारंगा फाटा) या राष्ट्रीय महामार्गाच्या प्रकल्प संचालकांनी जमिनी संपादनावेळी नोंदणी मुद्रांक शुल्क विभाग यांचे कोष्टक १६ (अ) नुसार मावेजा देण्याचे कबूल करुन जमीन संपादन आणि मालमत्ता मुल्यांकनाची सुरु केलेली प्रक्रिया, मावेजा देण्यासाठी शासनाने २०० कोटी रुपये उप विभागीय कार्यालयास देणे, उपविभागीय कार्यालयाने काही ठराविक शेतकऱ्यांच्या खात्यावर संबंधित बँकेच्या माध्यमातून आरटीजीएसद्वारे मावेजाची केवळ २० टक्के रक्कम वर्ग करणे, जमिनी संपादनावेळी ज्या १६(अ) कोष्टकानुसार मालमत्ता मुल्यांकन करुन मावेजाची रक्कम निश्चित करण्यात आली होती ते कोष्टकच प्रत्यक्ष मावेजा वाटपावेळी बदलवून २९(ब) नुसार मावेजाच्या रक्कमा वाटण्याची भूमिका प्रकल्प संचालक व उपविभागीय कार्यालयाकडून घेण्यात येणे, संपादित जमिनी किंवा मालकी हक्काबाबत काहीच तक्रारी नसताना मावेजाच्या जाहीर रक्कमांचे संपूर्णपणे वाटप होत नसणे, मावेजाची संपूर्ण रक्कम जमा न झाल्याने त्यांना व्याजाला मुकावे लागून बँकेत जमा रक्कमेचा लाभ उपविभागीय अधिकारी बँक खाते व संबंधित बँकेला होत असणे, अशा स्थितीत पूर्ण रक्कम व व्याजाचे झालेले नुकसान उप विभागीय अधिकारी कार्यालय भरुन देणार का अशी विचारणा प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांद्वारे करण्यात येणे, जमिनी संपादनावेळी जाहीर केलेल्या कोष्टकानुसार व दरानुसार नोटिसीत नमूद केलेल्या मूळ मावेजाच्या रक्कमेचे वाटप न करता मावेजाचे कोष्टकच बदलविणाऱ्या संबंधितांविरुद्ध फसवणूकीचा गुन्हा नोंदविण्याची संतप्त शेतकऱ्यांकडून मागणी करण्यात येणे व या संपूर्ण प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री. मनोहर भोईर, भरतशेठ गोगावले, सुनिल प्रभू, राजन साळवी, सदानंद चव्हाण, उदय सामंत, वैभव नाईक, शशिकांत शिंदे, जयदत्त क्षीरसागर, राजेश टोपे, सुरेश लाड, राहुल मोटे, दत्तात्रय भरणे, अजित पवार, दिलीप वळसे-पाटील, जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड, भास्कर जाधव, संदीप नाईक, पांडुरंग बरोरा, वैभव पिचड, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री. नरहरी झिरवाळ, हसन मुश्रीफ, राणाजगजीतसिंह पाटील, मकरंद जाधव-पाटील, दिपक चव्हाण, राहुल जगताप, सर्वश्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर, सुमन पाटील, ज्योती कलानी, सर्वश्री. पंकज भुजबळ, हनुमंत डोळस, अजय चौधरी, सुनिल शिंदे, श्रीमती तृप्ती सावंत, श्री. प्रताप सरनाईक, डॉ. बालाजी किणीकर, सर्वश्री. रुपेश म्हात्रे, सुभाष भोईर, सदा सरवणकर, मंगेश कुडाळकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ च्या पनवेल ते इंदापूर या ८४ किमी रस्त्याच्या पहिल्या टप्प्याचे संथ गतीने सुरु असलेले काम, सदर रस्त्याचे काम टोल्वेज प्रा.लि. कंपनीला देतांना प्रकल्पाची किंमत ९४२.६९ कोटी असून कंपनीने ९१० दिवसात म्हणजेच

दिनांक १२ जून, २०१४ पर्यंत महामार्गाचे काम पूर्ण करण्याचा केलेला करारनामा, पेण, वडखळ येथील कोकण रेल्वे मार्गावरील रेल्वे ब्रिज तसेच वाकण, कोलाड येथील नदीवरील पुल अर्धवट स्थितीत असणे, त्यामुळे या महामार्गावरील ८४ किमीचे अंतर पार करण्यास ५ ते ६ तासांचा लागत असणारा कालावधी, निकृष्ट दर्जाच्या रस्त्यांमुळे अपघातांचे वाढते प्रमाण, त्यातून होणारी जीवित व मालमत्तेची हानी, त्याच प्रमाणे आतापर्यंत अंदाजे २०६३ अपघातांमध्ये ६१५ मृत व्यक्तींच्या नातेवाईकांना आणि या अपघातात गंभीर जखमी झालेल्या २१३६ व्यक्तींना तसेच ८६१ किरकोळ जखमी व दुखापतग्रस्तांना कोणतीही आर्थिक मदत देण्यात न येणे, महामार्ग चौपदरीकरणामध्ये विस्थापित झालेल्या जमीनधारकांना ग्रामीण भागात ज्याप्रमाणे गुणांक २ मोबदला दिला जातो त्याप्रमाणे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ व कणकवली नगरपंचायती हद्दीतील विस्थापित जमीनधारकांना त्याच गुणांकात मोबदला देण्याची होत असलेली मागणी, मुंबई-गोवा महामार्ग क्र.६६ च्या कामासाठी ४२५.२८ कोटी रुपये खर्च होऊनही निकृष्ट दर्जाचे झालेले काम, सन २०१६ च्या गणेशोत्सवाच्या कालावधीपर्यंत कोकणात जाणाऱ्या जनतेला व्यवस्थित व विना अपघात जाणारा रस्ता मिळून सुरळीत वाहतूक पार पडेल अशी घोषणा राज्य शासनाने वारंवार करुनही आजपर्यंत त्याची पूर्तता न होणे, पुर्वीच्या तसेच नव्याने करावयाच्या महामार्गावरील कामाच्या निकृष्ट दर्जामुळे खड्डे भरण्यासाठी टोल्वेज प्रा.लि.कंपनीला अधिक ५०० कोटी रुपये देण्यात येऊनही वर्षभराचा कालावधी उलटून गेला तरी रस्त्यावर पडलेल्या मोठमोठ्या खड्डयांची अवस्था जैसे थे असणे, शासनाने तातडीने मुंबई-गोवा महामार्ग क्र.६६ चे पनवेल ते इंदापूर या ८४ कि.मी. रस्त्यासह गोवा पर्यंत महामार्गाचे काम पूर्ण होण्यासाठी करावयाची उपाययोजना व प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री. अतुल सावे, नारायण कुचे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महिला व बालविकास मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"औरंगाबाद जिल्ह्यात विविध संस्थामार्फत अनाथ बालक आश्रम सुरु असून त्यामध्ये ६ ते १८ वयोगटातील अनाथ मुलांना प्रवेश देणे, परंतु सन २०१३-१४ पासून शासनाकडून संस्थांना मिळणारे सहायक अनुदान न मिळाल्याने कर्मचाऱ्यांना नाममात्र मानधनावर काम करावे लागत असून विद्यार्थ्यांवर व संस्था चालकांवर उपासमारीची आलेली वेळ, अनाथ बालक आश्रम चालविणाऱ्या संस्थांना सहायक अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(ब) लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) संबंधित निवेदने सभागृहासमोर ठेवणे :-**

(या लक्षवेधी सूचनांची सूची जोडपत्राद्वारे वेगळी वितरीत करण्यात येईल.)

**(गुरुवार, दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९२ अन्वये प्रस्ताव)**

**बारा : अंतिम आठवडा प्रस्ताव :-**

**सर्वश्री. अजित पवार, राधाकृष्ण विखे-पाटील, जयंत पाटील, पृथ्वीराज चव्हाण, दिलीप वळसे-पाटील, डॉ पंतगराव कदम, सर्वश्री. शशिकांत शिंदे, विजय वडेट्टीवार, गणपतराव देशमुख, जितेंद्र आव्हाड, बाळासाहेब थोरात, जयदत्त क्षीरसागर, अब्दुल्ल सत्तार, भास्कर जाधव, प्रा. विरेंद्र जगताप, सर्वश्री. हसन मुश्रीफ, सुनिल केदार, संदिप नाईक, गोपालदास अग्रवाल, डॉ. सतीश पाटील, सर्वश्री. मो. आरिफ नसीम खान, सुरेश लाड, अमित देशमुख, दिलीप सोपल, डी. एस. अहिरे, राणाजगजितसिंह पाटील, ॲड यशोमती ठाकूर, सर्वश्री. बबनराव शिंदे, मधुकरराव चव्हाण, राहुल मोटे, डी.पी. सावंत, मकरंद पाटील, राजेश टोपे, बसवराज पाटील, शिवेंद्रसिंह भोसले, वसंतराव चव्हाण, दत्तात्रय भरणे, अमिन पटेल, बाळासाहेब पाटील, ॲड के.सी.पाडवी, सर्वश्री. कुणाल पाटील, संग्राम जगताप, काशीराम पावरा, श्रीमती. दिपीका चव्हाण, सर्वश्री हर्षवर्धन सपकाळ, हनुमंत डोळस, राहुल बोंद्रे, अवधुत तटकरे, विजय भांबळे, वैभव पिचड, अमर काळे, पांडुरंग बरोरा, अमित झनक, दिपक चव्हाण, रणजित कांबळे, श्रीमती अमिता चव्हाण, डॉ. संतोष टारफे, श्री. शेख आसिफ शेख रशीद, श्रीमती निर्मला गावीत, श्री. अस्लम शेख, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री. संग्राम थोपटे, भाऊसाहेब कांबळे, त्र्यंबक भिसे, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री. सिध्दाराम म्हेत्रे, भारत भालके, जयकुमार गोरे, संजय कदम, सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील, धैर्यशील पाटील, अबु आझमी, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९२ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यातील बिघडलेली कायदा व सुव्यवस्था, महिलांवरील अत्याचारात झालेली वाढ, गुन्ह्यांचा प्रतिबंध करण्यास शासनास आलेले अपयश, डिजिटल युगात ऑनलाईन फसवणुकीच्या वाढत्या प्रकारामुळे सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण, अल्पवयीन मुले, मुली व महिलांवर होणारे अत्याचार, प्रामुख्याने नागपूर व मुंबईतील वाढती गुन्हेगारी, लैंगिक छळ व अपहरणाचे वाढते प्रमाण, ज्येष्ठ नागरिकांवरील वाढते अत्याचार, नागपूर कारागृहात गत तीन वर्षात ३२ कैद्यांचा झालेला मृत्यू, रेल्वेतील वाढत्या गुन्हेगारीमुळे धोक्यात आलेली प्रवाशांची सुरक्षितता, मुंबईच्या भायखळा कारागृहात मंजुळा शेट्ये या महिला कैद्याचा कारागृहातील पोलिसांनीच मारहाण करुन घडवून आणलेला मृत्यू, तसेच सांगली जिल्ह्यात घडलेले कोथळे मृत्यू प्रकरण, तसेच नवी मुंबई, कळंबोली पोलिस स्टेशन येथे कार्यरत असलेल्या ए.पी.आय श्रीमती अश्विनी बोद्रे-गोरे यांचा त्यांच्याच पोलिस अधिकाऱ्यांनी केलेला खून, तसेच नागपूरमधील कुविख्यात गुंड मुन्ना यादवला पकडण्यात नागपूर पोलिसांना अपयश आल्याने पोलीस महासंचालकांनी पोलीस आयुक्त, नागपूर यांना केलेली विचारणा, सागरी व अंतर्गत सुरक्षेच्या उपाययोजना करण्याबाबत शासनाची उदासीनता, मुंबई-ठाणे येथे ४०० हून अधिक असलेली बनावट कॉलसेंटर्स, अवैध दारु, मटका, जुगार यांचे वाढते प्रमाण, मुंबईत वास्तव्य

करीत असलेल्या परकीय नागरिकांमार्फत मोठ्या प्रमाणात होत असलेली अमली पदार्थांची तस्करी, पोलिसांची निवासस्थाने व विविध ठिकाणच्या पोलीस स्टेशन्सची झालेली दयनीय अवस्था, गृह विभागातील १३ हजार पदे रिक्त असल्याने पोलिसांवर पडणारा कामाचा वाढता ताण, त्यात राज्यातील गृहरक्षक दल (होमगार्ड्स) यांच्या समस्यांकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, गेल्या दीड-दोन वर्षापासून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे महासंचालक पद रिक्त असणे, परिणामी देशात घडणाऱ्या भारतीय दंड विधान संहितेअंतर्गत दाखल होणाऱ्या दखलपात्र एकूण गुन्ह्यात महाराष्ट्र राज्य आघाडीवर असणे, तर आर्थिक गुन्हे शाखेकडील यादीनुसार मुंबई सुरक्षित शहराच्या यादीत ४५ व्या क्रमांकावर असणे, साडेतीन वर्षानंतरही डॉ. नरेंद्र दाभोळकर व कॉ. गोविंद पानसरे यांच्या हत्येचा तपास पूर्ण न होणे, तसेच समीर गायकवाड व विरेंद्र तावडे यांच्यासंदर्भात ठोस पुरावे असूनही सनातन संस्थेवरील बंदीबाबत कोणतीही कार्यवाही न करणे, दलितांवरील अत्याचारात झालेली वाढ, दुर्बलांवरील हल्ले रोखण्याची गरज असल्याचे मा. राष्ट्रपतींनी केलेले आवाहन, राज्यातील तुरुंगात मर्यादेपेक्षा अधिक ठेवण्यात आलेले कैदी, तुरुंगातील गैरप्रकारांना आळा घालण्यात आलेले अपयश, देश-परदेशातून आमदारांना जीवे मारण्याची देण्यात आलेली धमकी, शासनाने राज्यातील १३१४ शाळा बंद करण्याचा निर्णय घेऊन "सर्वांसाठी शिक्षण" या उद्देशाला फासलेला हरताळ, शिक्षणाचा हक्क कायद्याचा करण्यात आलेला भंग, परिणामी आदिवासी व ग्रामीण भागात निर्माण झालेला तीव्र असंतोष, या निर्णयाच्या विरोधात विविध संघटनांनी काढलेले मोर्चे, मुंबई विद्यापीठातील अनागोंदी कारभार व निकालात झालेल्या गोंधळामुळे निकालाची कालमर्यादा चुकणे, उपस्थित विद्यार्थ्यांना अनुपस्थित दाखविणे, पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रवेशाचा उडालेला बोजवारा, निकालास होणाऱ्या विलंबामुळे विदेशी शिक्षणाचा झालेला स्वप्नभंग, अनेक मंत्र्यांच्या भ्रष्टाचाराची प्रकरणे उघडकीस येणे, त्यावर कोणतीही कारवाई न होणे, त्यांची होत असलेली पाठराखण, अवैध प्रवासी वाहतूक टॅक्सी व रिक्षा चालकांची दादागिरी मिटरप्रमाणे भाडे न घेणे, ओला-उबेरला लोकांची असलेली वाढती मागणी वाढत्या वाहनांमुळे वाहतुकीची निर्माण झालेली समस्या, राज्यात जवळपास २ लाख अवैध वाहनांच्या वाहतुकीमुळे ४ हजार कोटी रुपयांचा राज्य मार्ग, परिवहन महामंडळाला झालेला तोटा, उत्पादन शुल्क विभागातील रिक्त पदांमुळे शासनाचा बुडत असलेला महसूल, गेल्या तीन वर्षात पोलिस दलाचे आधुनिकीकरणासाठी केंद्र शासनाकडून प्राप्त झालेला निधी, एकाही आर्थिक वर्षात पूर्णत: खर्च न झाल्यामुळे हा निधी केंद्र शासनास समर्पित करण्याची आलेली पाळी, राज्यातील न्याय वैद्यकप्रयोगशाळेत ४० हजारापेक्षा अधिक प्रलंबित असलेली प्रकरणे, पोलिसांसाठी आर्थिक तरतूद असतांनाही हजारो कोटींची देयके कोषागारातून नामंजूर झालेली असतांना बीडीएस प्रणालीवरील प्राधिकारपत्रे रद्द न करणे, परिणामी निधी शिल्लक असूनही त्याचा खर्च झाल्याचे दिसून येणे व त्याबाबत पोलीस प्रशासनाकडून झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**(गुरुवार, दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव.)**

तेरा : **श्री. सुनिल प्रभू, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. सदा सरवणकर, ॲड आशिष शेलार, सर्वश्री अजय चौधरी, सरदार तारासिंह, सुनिल शिंदे, ॲड राज पुरोहित, सर्वश्री मंगेश कुडाळकर, अतुल भातखळकर, अशोक पाटील, संजय केळकर, श्रीमती तृप्ती सावंत, सर्वश्री योगेश सागर, राजेश क्षीरसागर, ॲड पराग अळवणी, डॉ. सुजित मिणचेकर, सर्वश्री मंगलप्रभात लोढा, तुकाराम काते, अमित साटम, सुनिल राऊत, राम कदम, कॅ. आर. तमिल सेल्वन, श्रीमती मंदा म्हात्रे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"बोरीवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील आदिवासीपाडे आणि अधिकृत झोपडपट्टीतील रहिवाशी यांना स्थलांतरीत करण्याबाबत शासनाने आखलेली उपाययोजना, सर्वसाधारण पात्र झोपडपट्टीवासियांच्या स्थलांतरासाठी शासनाने घ्यावयाचा सकारात्मक निर्णय, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या सर्व्हे नं. २३९/१ या वन क्षेत्राची मोजणी करुन अतिक्रमित रहिवाशांचे त्याच क्षेत्रात पुनर्वसन करण्याबाबत दिंडोशी येथील लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०१६ व त्यानंतर वारंवार मा. मुख्यमंत्री, मा. वनमंत्री व मा. गृहनिर्माण मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केलेली मागणी, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील वन्य प्राण्यांचा शहरात होणारा मुक्त संचार व त्यावर करावयाच्या उपाययोजना, मुंबई शहरातील नद्या व नाले यांच्या रुंदीकरणामुळे बाधीत होणाऱ्या रहिवाशांचे त्याच ठिकाणी पुनर्वसन करणे, आशिया खंडातील सर्वात मोठया मुंबईतील धारावी येथील झोपडपट्टीचा पुनर्विकास करण्याचा शासनाने घेतलेला महत्वाकांक्षी निर्णय व आखलेली उपाययोजना, मुंबईतील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत आठ आमदारांच्या समितीने केलेल्या शिफारशीवर निर्णय घेण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असणे, या प्रस्तावावर तातडीने निर्णय होण्याची आवश्यकता, मुंबईतील महानगरपालिकेच्या जागेवरील व भाडे करार संपुष्टात आलेल्या जीर्ण इमारतींच्या भाडेकरारांचे नुतनीकरण करण्याची आवश्यकता, राज्यात पंतप्रधान आवास योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी ३३ हजार ५०० व इतरांसाठी ६२५० घरे उभारण्याची म्हाडाने आखलेली उपाययोजना, याबाबत करावयाची निर्णयात्मक कार्यवाही विचारात घेण्यात यावी."

## अशासकीय कामकाज

## (बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)

चौदा : **अशासकीय विधेयके :-**

**(अ) पुर:स्थापनार्थ :**

(१) सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ८१ – महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१७ – **श्री.अतुल भातखळकर, वि.स.स.**

**यांचे.**

(२) सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ८२ – महाराष्ट्र देवता, संत, राष्ट्रपुरुष, धर्मग्रंथ यांचे विडंबनावर नियंत्रण विधेयक, २०१७ – **श्री.मनोहर भोईर, वि.स.स. यांचे.**

**(ब) विचारार्थ :**

(१) सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ५१ – महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१६ – **श्री.मनोहर भोईर, वि.स.स. यांचे.**

(२) सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ५ – महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन (सुधारणा) विधेयक, २०१७ – **श्री.मनोहर भोईर, वि.स.स. यांचे.**

(३) सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ७० – सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७ – **श्री.मंगलप्रभात लोढा, वि.स.स. यांचे.**

(४) सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १४ – महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) (सुधारणा) विधेयक, २०१७ – **श्री.मंगलप्रभात लोढा, वि.स.स. यांचे.**

# " राष्ट्रगीत "

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : २१ डिसेंबर, २०१७

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.